# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३६/२००९/ दिनांक :

श्री. चिंचमाई सहकारी पाणी पुरवठा संस्था,
तारळे खुर्द, ता. राधानगरी, अर्जदार
जि. कोल्हापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
ताराबाई पार्क, कोल्हापूर विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभाग २, कोल्हापूर.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, राधानगरी, जि. कोल्हापूर

**<u>कोरम</u> :-** १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : २४.०७.२००९

सदर प्रकरणामध्ये सुनावणीच्यावेळी मा.अध्यक्ष त्यांच्या कांही कामामुळे हजर नव्हते. त्यामुळे सदरचे प्रकरण सदस्य सचिव श्री. एस.आर.बांबळे व ग्राहक सदस्य श्री. जी.सी. लेले असे दोघांपुढे सुनावणीसाठी घेतले अशावेळी नियमाप्रमाणे सदस्य सचिव यांनी सुनावणीचे कामकाज पाहिले.

श्री. चिंचमाई सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, मु.पो. तारळे खुर्द, ता. राधानगरी हि ग्राहक संस्था शेतकऱ्यांना पाणी पुरवठा करते. मंजूर भाराची आवश्यकता नाही, भार कमी करावा म्हणून अर्ज केला. तथापि, लोड कमी करणेस विलंब झाल्यामुळे विनाकारण जुन्या मंजूर भाराप्रमाणेच वीज बील व इतर आकार भरावे लागले. अन्याय झाला आहे म्हणून ' क्ष ' फॉर्ममध्ये कोल्हापूर मंडल, कोल्हापूर यांचेकडे दि. ३०.१.२००९ रोजी अर्ज दाखल केला. त्याचा निर्णय अंतर्गत कक्षाने निर्णय क्र ३०४१ दि. ७ मे २००९ दिला. सदरचा निर्णय मान्य न झाल्याने सी.जी.आर.एफ. कोल्हापूर परिमंडल यांचेकडे ' अ ' फॉर्ममध्ये दि. २२.५.२००९ रोजी दाखल केला. तक्रार दाखल करुन घेवून मंचाने वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागितला व दि. २२.६.२००९ रोजी मंचाने कार्यालयात सुनावणी घेतली. सुनावणीच्यावेळी ग्राहक संस्थेचे चेअरमन व प्रतिनिधी तसेच राधानगरी उप विभागाचे सहाय्यक लेखापाल वणकुद्रे व कोल्हापूर सर्कलतर्फे श्री. जोशी उपस्थित होते.

मुळ तक्रार अर्ज, त्यावरील वि.प.कडील पत्र-व्यवहार, वि.पने केलेली कार्यवाही, अंतर्गत कक्षाचा निर्णय याचा एकत्रित विचार करता, ग्राहकाची तक्रार व मागणी व त्यावरील वि.प.ची भूमिका व कार्यवाही पुढील प्रमाणे –

ग्राहकाची तक्रार व मागणी तपशिल पुढील प्रमाणे

वरील तक्रारदार संस्था श्री. चिंचमाई सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित म्हणून सहकार कायद्याखाली नोंदविलेली संस्था आहे. सदर संस्था लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी पुरवठा करते. त्यासाठी शासनाच्या पाटबंधारे खात्याकडून संस्थेस पाणी परवाना मिळालेला आहे. सदर पाणी परवान्यानंतरच वि.प.कडून विद्युत पुरवठा केला जातो. म्हणून तक्रारदाराने तसा पाणी परवाना जोडलेला दिसतो. तक्रारदार संस्थेच्या तक्रारीप्रमाणे संस्थेने ८० एचपी इतका मंजूर वीज भार सध्या आवश्यकता नाही म्हणून दि. २५.११.२००३ रोजी आवश्यक ती कागदपत्रे जोडून ४० एचपी इतका भार मंजूर ८० एचपी भारातून कमी करुन ४० एचपी चाच भार शिल्लक ठेवावा असा प्रस्ताव दाखल केल्याचे दिसून येते. सदर प्रस्तावास पत्र क्र. ६६१८ दि. ८.९.२००६ ने दि. २८.५२००४ पासून लोड कमी केलेले व फरकाची अनामत रक्कम रु. १६८००/- कपॅसिटर टेस्टींग फी रु. १००/- व मिटरची रक्कम रु. २२३५९/- अशी रु. ३९२५९/- इतकी रक्कम जमा करणेची ऑर्डर दिली आहे. वरील पत्र क्र. ६६१८ ग्राहकास मान्य नसल्याचे दिसून येते. तसे ग्राहकाने आपल्या दि. २५.३.२००७ च्या पत्रात नमूद केले आहे. लोड कमी करण्यासाठी दि. २५११.२००३ ला अर्ज व इतर आवश्यक कागदपत्रे जोडलेली असतांनाही दि २८.५२००४ पासून लोड कमी केला त्यामुळे अर्ज दिलेल्या तारखेपासूनच ४० एचपी वीज बील रक्कम दंड व व्याज याची वजावट होण्याची मागणी केलेली आहे. शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या सवलतीचा फायदा मिळू शकला नाही. दिनांक ९.५.२००६ रोजी चुकीच्या नांव नोंदीबाबत अर्ज दिला व सहाय्यक अभियंता यांनी सांगितल्याप्रमाणे कागदपत्रे जोडूनही नावांत दुरुस्ती झालेली नाही. त्यामुळे आमची बीले दुसऱ्या ग्राहकांस मिळतात व आम्हाला दरखेपेस ' कोटेशन ' घेवून रक्कम भरावी लागत आहे. त्याचा नाहक त्रास होत आहे.

१९९२ पर्यंत चिंचमाई पाणी पुरवठा माझेच नांव असलेली बीले येत होती, परंतु नंतर चुकीच्या नावांने पण आमचा ग्राहक क्रमांक घालून बीले निघत होती. ती सदर नांव असलेल्या संस्थेत जात असल्याने रक्कम जमा करणेस विलंब होत होता. त्यास कंपनी जबाबदार आहे. त्यामुळे दि. २५.११.२००३ पासून दि. २८.५.२००४ पर्यंतचे ४० एचपीचे बील कमी करावे. त्यावरील दंड व व्याज माफ करावे तसेच पुढीलही दंड व व्याज माफ करावे, नावांत चूक करुन आम्हास त्रास झाल्याबद्दल कारवाई करावी इ. मागण्या तक्रारीत नोंदविल्या आहेत.

वि.प.ची भूमिका व कार्यवाही

ग्राहकाने तक्रार दाखल केली आहे. त्यातील मागणी मान्य नसल्याचे वि.प.ने नमूद केले आहे. लोड कमी अक्षर जास्त करण्यास मंजुरी विभागीय स्तरांवर मिळते. त्याप्रमाणे पत्र क्र. ६६१८ दि. ८.९.२००६ रोजी च्या पत्रातील मंजुरीप्रमाणे दि. २८.५.२००४ पासून लोड कमी केलेला आहे. त्याची वजावट दि. ३०.५.२००७ च्या बी–८० प्रस्तावाने रु. ८२,०००/– मूळ बिलाची रक्कम जून २००७ च्या बिलातून कमी केली आहे. व्याजाची वजावट रु. ११,०००/– हि पण बील दुरुस्तीचा बी–८० प्रस्ताव मंजूर करुन घेवून वजावट केली आहे. त्यामुळे बील दुरुस्ती व व्याज माफ करणे हि मागणी पूर्ण झाली आहे. विभागीय कार्यालयाने दिलेल्या मंजुरीच्या दिनांक २८.५.२००४ पासूनचा फरक वजावट केली आहे व ती योग्य व बरोबर आहे. नावांतील बदलासंबंधी सहाय्यक अभियंता यांनी आवश्यक कागदांची पूर्तता करण्यासाठी कळविले आहे. तथापि कागदपत्रांची पूर्तता ग्राहकाने केलेली नाही. त्यामुळे नावांतील बदल करता आला नसल्याचे सुनावणीच्या दरम्यान सहाय्यक लेखापाल श्री. वणकुद्रे यांनी कथन केले.

ग्राहकाची तक्रार व मागणी त्यावरील वि.पची भूमिका व कार्यवाही अंतर्गत कक्ष, कोल्हापूर सर्कल यांचा निर्णय व याकामी उभयतांनी दाखल केलेली कागदपत्रें यावरुन पुढील मुद्दे निष्कर्षासाठी उदभवतात.

प्रश्न १ : तक्रारदार ग्राहकाचे नांवे ८० एचपीची जोडणी आहे काय ?

उत्तर : नाही. तथापि, सदर तक्रारदार संस्थेचा एक ग्रुप आहे व त्यातील एक खातेदार चिफ प्रमोटर, पाणी पुरवठा मंडळ, तारखे खुर्द असे ८० एचपीचे २६५०३०२४१४१३/७ अशा क्रमांकाचे खाते आहे.

प्रश्न २ : तक्रारदार ग्राहकाने लोड कमी करण्यासाठी अर्ज व सोबत आवश्यक ती कागदपत्रें जोडली आहेत काय ? तशी मागणी कोणत्या तारखेस केली ?

उत्तर : होय. कागदपत्रें जोडनू दि. २५.११.२००३ रोजी लोड कमी करण्यासाठी अर्ज दिला आहे.

प्रश्न ३ : अर्ज तारखेपासून लोड कमी करुन बील व व्याज यात दुरुस्ती वजावट केली आहे काय ?

उत्तर : नाही. दि. २५.११.२००३ चा अर्ज आहे. दि. २८.५.२००४ पासून लोड कमी करण्यास विभागाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे दि. २८.५.२००४ पासून म्हणजे जून २००४ पासून सप्टेंबर २००६ पर्यंतचा कालावधी वजावटीसाठी धरला आहे.

प्रश्न ४ : अर्ज तारखेपासून लोड कमी केल्याचा बिलातील व व्याजातील फरक देणे, वजावट करणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय. अर्ज तारखेपासून मागणी मान्य करुन तशी वजावट देणे योग्य आहे.

प्रश्न ५ : नावांतील बदल अर्ज व कागदपत्रे दिल्यावर करणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय. आवश्यक पेपर दिल्यावरच नावांत बदल करणे योग्य आहे.

कारणमिमांसा

सदरील तक्रारदार चिंचमाई सहकारी पाणी पुरवठा संस्था हि मूळ मातृ संस्था आहे. सदर ग्राहक संस्थेस दि. २२.५.१९६९ रोजी पूर्वीच्या एम.एस.ई.बी. ने पाणी उपसा व पुरवठा करणेसाठी ८० एचपीचे कनेक्शन मंजूर केलेले आहे. सदर चिंचमाई पाणी पुरवठा मंडळ, तारळे खुर्द नांवावर साधारणपणे १९९३ सालापर्यंत पूर्वीचे वीज मंडळ बील देत असल्याचे दिसते. त्यानंतरच्या काळात केव्हा व कुणाच्या मागणीने नावांत बदल केला हे कळून येत नाही. ग्राहकाने दाखल केलेली डिसेंबर १९९० व जुलैं १९९१ मधील पूर्वीच्या वीज मंडळाची बीले चिंचमाई पाणी पुरवठा अेजी–३९ –८० एचपी अशी आहेत. नंतरच्या काळातील दि. १९१०.२००६ च्या बिलावर चिफ प्रमोटर, दत्त पी.पी. मंडळ अेजी ३९ – ८० एचपी या नोंदी बरोबर ग्राहक क्र. २६५०३०२४१४१३ अशी नोंद आहे व नंतर सन १९०७ व १९०९ मधील बिलावर चिफ प्रमोटर, पी.पी. मंडळ अेजी ३९ – ८० एचपी व ४० एचपी व ग्राहक क्र. २६५०३०२४१४१३ अशी नोंद आहे हे मुद्दाम विस्तृतपणे नमूद केले आहे, म्हणजे नांवातील बदल कंपनीनेच केलेला असल्याचे दिसून येते. चिफ प्रमोटर, दत्त पी.पी. मंड्ळ म्हणून कुंभारवाड्यात एक संस्था काम करीत असल्यामुळे केवळ नांवावरुन वीज कंपनीने दिलेली बीले कुंभारवाड्यात सदर संस्थेस मिळत असल्याने दरखेपेस कोटेशनने रक्कम जमा करावी लागल्याचे दिसून येते. तरीही ग्राहकाने परत दि. ९.५.२००६ च्या पत्राने नांवात दुरुस्तीचे कळविले आहे. कंपनीने कागदपत्रें मागितली व ती दिली नाहीत म्हणून नांवात बदल करता येत नाही हे कंपनीचे म्हणणे योग्य नाही. कारण वर नमूद केल्याप्रमाणे दर खेपेस जुना ग्राहक क्रमांक व नवा ग्राहक क्रमांक, मंजूर भार इ. मजकूर एकच मात्र नांव नवीन असे का झाले याचा खुलासा कंपनीने केलेला नाही. ग्राहकाचे चिंचमाई नावानेच दुसरे २६५०३०२४१५७० अेजी –१९९ असे १५ एचपीचे खाते चालू आहे त्यामुळे ग्राहकाने आता ज्या नांवावर कंपनी बील देते त्याच नावांवर लोड कमी करण्याचा अर्ज दिला व कंपनीनेही त्यास विलंबाने का होईना मंजुरी दिली.

दि. २५.११.२००३ रोजी अर्ज देत असतांना बिलाची पूर्ण बाकी कंपनीकडे जमा करुनच मागणी केली आहे, तशी अट कंपनीने घातली होती. त्यामुळे दि. २५.११.२००३ पासून दि. ८.९.२००६ पर्यंतचा कालावधी बील दुरुस्तीसाठी विचारांत घ्यावा लागेल. कंपनीने अर्ज दिल्याच्या तारखेपासून ६ महिने विलंबाची तारीख का घेतली व त्यासही दि. ८.९.२००६ साल का उजाडले याचा खुलासा करतांना डिव्हीजनस्तरावर सदरची मंजुरी होत असल्याने विलंब झाला असल्याचे मोघम उत्तर सुनावणीच्यावेळी दिले आहे. वास्तविक मंजूर पत्राबरोबरच बिलातील वीज बील रक्कम व व्याज याची वजावट एकत्रित बी–८० देणे आवश्यक होते. ते करण्यासाठी परत १ वर्ष म्हणजे जून २००७ व व्याजाची वजावट देण्यासाठी मार्च २००९ उजाडले. हि कृती वि.प.च्या सेवेतील त्रुटी आहेत त्यास व्यवस्थापनातील दिरंगाई कारणीभूत आहे. प्रस्ताव मंजूर करतांना व परत अनामत रकमेची पावती देतांना दोन्हीकडे वेगळाच म्हणजे ग्राहक क्र. २६५०३०२४१४२५/७ असा टाकलेला दिसून येतो. त्या दुरुस्तीसाठी परत अर्ज हा सर्व व्याप विनाकारण ग्राहकास सोसावा लागत आहे.

त्यामुळे सर्व कागदपत्रांची छाननी व अभ्यास करतां, ग्राहकास दि. २५.११.२००३ पासून दि. ८.९.२००६ पर्यंतची बीले नव्याने ४० एचपी वापराप्रमाणे करुन देवून ग्राहकाने वरील कालावधीमध्ये वेळोवेळी जमा केलेली रक्कम विचारांत घेवून नवीन बील द्यावे लागेल. तसेच दि. २५.११.२००३ ते दि. ८.९.२००६ पर्यंत ८० एचपी वापराची दिलेली बीले व नंतर बील दुरुस्ती बी–८० प्रस्ताव रद्द करुन वरील काळातील बील रक्कम व जमा रक्कम याची वजावट करुन तसा नवीन बी–८० प्रस्ताव कार्यालयास देवून मंजूर करुन घेवून

ग्राहकास सर्व हिशोब समजावून सांगावा लागेल. त्याचप्रमाणे ग्राहकाच्या मागणी अर्जाप्रमाणे नावांत दुरुस्ती करुन घ्यावी. वास्तविक दुसऱ्या बिलींग सायकलच्या पूर्वी नावांत बदल होणे आवश्यक होते, तसे झालेले दिसत नाही.

## <u>आदेश</u>

१) अंतर्गत कक्षाचा आदेश अंशत: रद्द करण्यात येत आहे.

२) जून २००७ मध्ये बील रक्कम दुरुस्तीसाठी व मार्च २००९ मध्ये व्याज दुरुस्तीसाठी दिलेले बी–८० रद्द करावेत.

३) दि. २५.११.२००३ पासून ४० एचपी वापराप्रमाणेची दि. ८.९.२००६ पर्यंतची बीले द्यावीत व त्यातून वेळोवेळी जमा केलेली रक्कम वजावट करुन निव्वळ बाकी कळवावी.

४) दि. २५.११.२००३ पासून आजअखेरचे व्याज व दंड रक्कम रद्द करावी.

५) ग्राहकाच्या मागणीनुसार कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर नावांत बदल करावा.

६) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

७) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)

सदस्य

दिनांक : २४.७.२००९

ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३६/२००९/ दिनांक :

श्री. चिंचमाई सहकारी पाणी पुरवठा संस्था,
तारळे खुर्द, ता. राधानगरी, अर्जदार
जि. कोल्हापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
ताराबाई पार्क, कोल्हापूर विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभाग २, कोल्हापूर.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, राधानगरी, जि. कोल्हापूर

**कोरम :-** १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ३१.०७.२००९

सदर प्रकरणामध्ये सुनावणीच्यावेळी मा.अध्यक्ष त्यांच्या कांही कामामुळे हजर नव्हते. त्यामुळे सदरचे प्रकरण सदस्य सचिव श्री. एस.आर.बांबळे व ग्राहक सदस्य श्री. जी.सी. लेले असे दोघांपुढे सुनावणीसाठी घेतले अशावेळी नियमाप्रमाणे सदस्य सचिव यांनी सुनावणीचे कामकाज पाहिले.

श्री. चिंचमाई सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित (ग्रा.त.नि.मं. प्रकरण क्र. ३६/०९) यांचे तारळे खुर्द, ता. राधानगरी, जि कोल्हापूर येथे १९६५ पासून ८० अश्वशक्ती सहकारी जलसिंचन योजनेची अश्वशक्तीच्या बिलींग पध्दतीची वीज जोडणी आहे. सभासद संख्येतील गळतीमुळे व आर्थिक अडचणीमुळे सदर

योजनेचा जोडलेला विद्युत भार ८० अ.श. वरुन ४० अ.श. करणेस सर्व कागदपत्रांसह अर्ज तत्कालिन म.रा.विद्युत मंडळाकडे दाखल केले. त्यास ३ वर्ष उलटलेनंतर मंजुरी मिळाली व दरम्यानचे काळात मंजुरी चौंकशी करता कार्यालयास हेलपाटे घालावे लागून प्रवास खर्च, व त्रास सोसावा लागला. मंजुरीप्रमाणे सदर काळाचे भारामधील कपातीनुसार ४० अ.श.भाराचे वीज बील दंड व व्याज माफ करुन बनवून मिळावे, दि. २५.११.२००३ ला अर्ज दिलेपासून मंजुरी आदेशाच्या काळातील सुरुवातीच्या दिनांक २८.५.२००४ पर्यंतच्या काळाचे बीलेही तसेच मिळावीत. वि.प.कडून जोडणीचे नांवात चुकीमुळे बदल केलेमुळे बीले ताब्यात न मिळता दुसरीकडे जातात व त्यामुळे दुसरी बीले बनवून भरावी लागतात. सदर चुकलेले नांव दुरुस्त होवून मूळ नांव करणेत यावे. इतर १५ अश्वशक्ती जोडणीचा मीटर / कपॅसिटर न बसविल्याच्या कारणावरुन वि.प.च्या कर्मचाऱ्यांनी त्रास देवून वीज पुरवठा बंद ठेवला व कृषी संजीवनीचा दोन्ही जोडण्यांना लाभ मिळाला किंवा कसे ? याचा तपशील मिळावा अशी तक्रारदाराची मागणी आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांजकडे क्ष नमुन्यात प्रकरण दि. १३.१.२००९ ने दाखल केले होते. त्यावर कक्षाने सुनावणी घेवून आदेशपत्र क्र ३०४ दि. ७.५२००९ ने निकाल दिला आहे. सदर निकाल मान्य न झालेमुळे अर्जदाराने मंचाकडे दि. २२.५.२००९ रोजी अपील दाखल केले आहे. त्यानुसार मंचाने कार्यवाही अंतर्गत वि.प.चे संबंधित अधिकाऱ्याकडून मुद्देनिहाय माहिती मागविली व सुनावणी दि.२२.६.२००९ रोजी कोल्हापूर येथे झाली. सुनावणीच्यावेळी ग्राहक संस्थेचे चेअरमन व प्रतिनिधी तसेच राधानगरी उप विभागाचे सहाय्यक लेखापाल वणकुद्रे व कोल्हापूर सर्कलतर्फे श्री. जोशी उपस्थित होते.

<u>तक्रारदार यांचे म्हणणे</u>

श्री. चिंचमाई सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, तारळे खुर्द, ता. राधानगरी, जि कोल्हापूर ग्राहक क्रमांक २६५०३०२४१४१३/७ यांचे त्या ठिकाणी सन १९६५ पासून ८० अश्वशक्तीची व सन १९८६ पासून अन्य ग्राहक क्र. २६५०३२२४१४२५ ही १५ अ.श.ची अशा सहकारी पध्दतीच्या शेती जल सिंचन योजना अस्तित्वात आहेत. सदर संस्थेचे सभासद असलेल्या कांही शेतकऱ्यांची वैंयक्तिक स्वतंत्र शेती पंप बसवून घेतलेमुळे संस्थेची सदस्य संख्या घटली आहे. त्यामुळे वाढीव वीज बील यंत्रसामुग्री, देखभाल दुरुस्ती खर्च संस्थेला परवडत नाही. त्यामुळे ग्राहक क्र. २६५०३०२४१४१३/७ चा वीज जोडणीचा जोडलेला मूळ भार ८० अ.श. कमी करुन ४० अश्वशक्तीस मंजुरी घेणेचे ठरले. त्यानुसार वि.प.कडे दि. २५.११.२००३ ला भार कमी कपात होणे करीता सर्व कागदपत्रांसह अर्ज दाखल केला व पोहोच घेतली. तथापि सदर प्रकरणास ३ वर्षा उलटल्यानंतर दि. ८.९.२००६ ला मंजुरी मिळाली. त्यात नवीन करारपत्र करुन घेणे व वाढीव अनामत रक्कम रु. १६८००/– भरुन घेणे ह्या अटी नमूद करण्यात आल्या, हा संस्थेवर अन्याय झाला. वाढीव वीज बिलावरील अनामत रक्कम , व्याज इ. कारणांमुळे संस्थेचे वीज जोडणीचा वीज पुरवठा बंद केला जाणे व त्यामुळे गैंरसोय होऊन सभासदांची पीके वाळणे इ. प्रकार घडले आहेत. संस्था अश्वशक्तीप्रमाणे बीले भरत असतांना अन्य १५ अ.श. जोडणी क्र. २६५०३२२४१४२५ चे मीटर/ कपॅसिटर बसविला नसलेचे कारणास्तव वि.प.कडून २/ २ महिने वीज पुरवठा खंडित करुन ठेवणेचे प्रकार घडले आहेत व दि. १९.१२.२००७ अखेर वीज पुरवठा बंद ठेवणेचा प्रकार झाला आहे. त्यावेळी पाण्याअभावी पीके वाळून सभासदांचे लाखो रुपये नुकसान झाले आहे, त्यास वि.प. जबाबदार आहेत, कारण संस्थेने जोडणी क्र २६५०३७२४१४१३/७ चे पूर्ण वीज बीले अश्वशक्ती प्रमाणे भरलेली आहेत.

तसेच त्यावेळी जाहीर झालेली कृषी संजीवनी योजनेचा लाभ मिळणे करीता भरावी लागणारी पूर्ण रक्कम भरली आहे. दोन्ही जोडण्यांना कृषी संजीवनी योजनेचा मिळालेल्या लाभाचा तपशील देणेत यावा. कृषी संजीवनी योजनेचे अंमलबजावणीच्या काळात वीज भार कमी करुन घेतला होता, परंतु वि.प.कडून भार कपातीच्या प्रकरणास ३ वर्षांनी मंजुरी मिळालेने तो पर्यंत ८० अश्वशक्ती प्रमाणे भरावे लागलेले वीज बील, आकारलेले व्याज, इंधनभार यामुळे संस्था बंद पडणेचे मार्गावर आहे. अशाप्रकारे जोडणीचा भार कमी करणेस मंजुरी मिळणेस झालेल्या विलंबामुळे ३ वर्षे भरावी लागलेली वीज बील रक्कम परत मिळावी /बिलातून कमी करुन मिळावी, शासन घोषित कृषी संजीवनी योजनेचे कालावधीत जोडणी भार कपातीस दि. २५.११.२००३ ला अर्ज दाखल केला असलेमुळे तेव्हापासून पुढे ८० अ.श. ऐवजी ४० अ.श. नुसार वीज बीले मधल्या काळात भरलेल्या रकमा वजा होवून दुरुस्त करुन संस्थेस मिळावीत. सदर कार्यवाही त्या त्या वेळी झाली असती तर आतापर्यंत संस्थेने सर्व वीज बीले भरली असती व संस्थेचे नांवावर आज थकबाकी दिसली नसती.

वीज जोडणी क्र. २६५०३२२४१४१३ चे मूळ नांव चिंचमाई पाणी पुरवठा सहकारी संस्था मर्यादित असतांना त्या ठिकाणी वि.प.कडून चिफ प्रमोटर, दत्त पाणी पुरवठा मंडळ असे नांव बदलले आहे तरीसुध्दा संस्थेने त्या नावाने बीले आतापर्यंत भरलेली आहेत. सदर नांवातील चुकीमुळे बीले ताब्यात मिळत नाहीत व अन्य ग्राहकांकडे जातात परिणामी त्रास, मनस्ताप सोसून दुसरी बीले बनवून घेवून भरावी लागतात. दुरुस्त होवून मिळावे या प्रमाणे तक्रारदार यांनी म्हणणे मांडले.

वितरण कंपनीचे म्हणणे

वितरण कंपनीने अपले म्हणण्यात ग्राहकाचे तक्रारीनुसार अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे निकालानुसार वीज जोडणीचा भार ८० अ.श. वरुन ४० अ.श. करण्यास कार्यकारी अभियंता, कोल्हापूर ग्रा. वि. क्र. २ यांचा आदेश क्र. ६६१८ दि. ८.९.२००६ने मिळालेल्या मंजुरीनुसार १ जून २००४ पासून पुढील काळाचे बील ४० अ.श.प्रमाणे दुरुस्त करुन देणेत आली आहेत. तसेच त्यावेळी नजरचुकीने लागलेली व्याजाची रक्कम रु. ११,०००/– ही बील दुरुस्ती करुन कमी करुन देणेत येत असलेचे सांगितले.

सदरस्य सचिव यांचा निष्कर्ष

सदर तक्रारीचा मुद्दा हा सन २००३ काळातील असलेमुळे महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे विनियम त्यास लागू राहणार नाहीत. ग्राहकाने दि. २५.११.२००३ ला वि.प.ला दिलेल्या अर्जात एकतर्फी, अर्जास मंजुरी मिळणेआधीच स्वत:हून वीज जोडणीचा भार ८० अ.श.वरुन ४० अ.श. केलेचे नमूद केले आहे. प्रत्यक्षात विद्युत ठेकेदाराच्या चाचणी अहवालात सदर ४० अ.श. मोटर पंप बसविलेची चाचणी दि. २६.१२.२००३ रोजी घेतल्याचे नमूद केले आहे. तसेच तक्रार प्रकरणासोबत मंचास सादर केलेल्या हुबेहूब अनुक्रमांक व इतर तपशील असलेल्या याच चाचणी अहवालाच्या कांही प्रतीवर या चाचणी केलेच्या दिनांकात फेरफार करुन २६.१०.२००३ करण्यात आलेले दिसून येते. तसेच तक्रारदाराने ४० अ.श.ची विद्युत यंत्रसामुग्री मे. साईबाबा इलेक्ट्रीकल अँड मशिनरी, १५१० लक्ष्मीपुरी, कोल्हापूर येथून खरेदी केल्याची कॅश मेमो क्र. २०२५६ मध्ये इतर सर्व तपशील स्पष्ट दिसत आहे, परंतु नेमका पावतीचा दिनांक पूर्णपणे अस्पष्ट आहे. तसेच टेस्ट रिपोर्टच्या मागील बाजूस वि.प.चे अधिकारी व कर्मचारी यांचा सदर विद्युत मांडणी संचाची दि. २८.५.२००४ रोजी पडताळणी केल्याचे प्रमाणित केले आहे. नियमाप्रमाणे कोणत्याही वीज मांडणी संचामधील मांडणीचा फेरफार करतांना वीज पुरवठा करणाऱ्या कंपनीशी संपर्क साधून सदर बदल वि.प.कडून पडताळणी करुन व कागदोपत्री नोंद करुन घेणे हे अपरिहार्य व आवश्यक आहे.

या प्रकरणामध्ये ग्राहकाने एकतर्फी वीज भारात कपात करुन कमी भाराचे विद्युत मोटर पंप बसविल्याचे व तसा विद्युत मांडणी संच बसविल्याचा टेस्ट रिपोर्ट वि.प.ला दिल्याचे म्हणत आहे. तथापि या बाबत वि.प.कडे या केलेल्या बदलाबाबत समन्वय साधल्याचे दिसत नाही. सबब तक्रारदाराचा दि. २५.११.२००३ ला ४० अ.श.ची मोटर बसविल्याचा चाचणी अहवाल दिल्याचा दावा, आधार व पुरावा नसलेमुळे, ग्राह्य धरता येणार नाही. परिणामी, ग्राहकाने ४० अ.श.चा वीज मोटर बसविल्याचा टेस्ट रिपोर्ट कंपनीस दि. २८.५.२००४ ला दाखल केल्याचे दिसते व त्यानुसार वि.प.कडून सदर दिनांकापासून पुढे वीज भारामध्ये कपात मंजूर करुन देण्याचा आदेश व वीज भाराच्या पडताळणीची कार्यवाही झालेची दिसते. ग्राहकाने टेस्ट रिपोर्ट वि.प.ला सादर केल्याचे कोणतीही स्पष्ट पोहोच मंचाला सादर केलेली नाही.

मंचातर्फे वि.प.कडून तक्रारदाराच्या इतर कांही मुद्दयांवर अधिक माहिती मागविली. त्या नुसार तक्रारदारास कृषी संजीवनी योजनेचा फायदा दिल्याचे व चुकीने लागलेले ग्राहक क्रमांक २६५०३७२४१४१३/७ चे मूळ नांवाप्रमाणे दुरुस्ती करुन देण्यात आल्याचे वि.प.कडून का.अ. को.ग्रा.२ यांचे पत्र क्र. ३८६३ दि. १.८.२००९ ने कळविण्यात आले.

सदर तक्रार मंचाकडे दाखल झालेनंतर वितरण कंपनीकडून तक्रार प्रकरणाबाबत अधिक तपशील जमविणे असलेमुळे दोन महिन्यानंतर निकालपत्र देण्यात येत आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रें, युक्तीवाद इ. विचारांत घेवून सदस्य सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच यांचेतर्फे खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहे.

## **आदेश**

१) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचा मंजुरीनुसार दि. २८.५.२००४ पासून पुढे भार कपात केलेनुसार बील आकारणी होणेचा निर्णय कायम करणेत येत आहे.

२) तक्रारदाराने अर्ज दिल्याचे दि. २५.११.२००३ पासून दि. २७५.२००४ पर्यंत काळात भार कपात नुसार बील दुरुस्ती करण्याची मागणी फेटाळण्यात येत आहे.

३) भरपाईबाबत आदेश नाही.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(एस. आर. बांबळे )
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

दिनांक : ३१.७.२००९